# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ९/२/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२१) इतिवृत्त

**सोमवार,** दिनांक **०९ फेब्रुवारी २००९ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी १२-१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.प्रभारी आयुक्त तथा उप आयुक्त(म.)श्री.उध्दव घुगे, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान मामु
२. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
३. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
४. श्री.वसंत नरवडे पाटील
५. सौ. अल्पा विकास जैन
६. श्री. संजय रामदास जोशी
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
९. श्री. रविकांत काशीनाथ गवळी
१०. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
११. श्री. कचरू श्रीपत सोनवणे
१२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
१३. श्री. सिताराम इसराम सुरे
१४. श्री. नारायण कुचे
१५. श्री. जावेद हसन खान

**<u>विषय क्र. १९९ :</u>**

दिनांक **७/१/२००९** (का.प.क्र.**१९**)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>ठराव :</u>**

दिनांक ७/१/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. २०० :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.८, पडेगांव-मिटमिटा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे व विविध ठिकाणी मेनहोल चेंबर बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रू.१०,९९,२३४/- ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून सदरील कामाची निविदा मागविली असता एकुण (३) निविदिपत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकुण (३) तीन निविदापत्रके भरून प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अब्दुल कदीर शेख रहीम | 18.02% कमी दराने |
| 2. | मे. खिरखानी कन्स्ट्रक्शन | 16.01% कमी दराने |
| 3. | श्री. एस. ए. देशमुख | 11.09% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची श्री.अब्दुल कदीर शेख रहीम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.०२% कमी दराची निविदा आहे. करिता श्री.अब्दुल कदीर शेख रहीम यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा १८.०२% कमी दराने करून घेणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८, पडेगांव-मिटमिटा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे व विविध ठिकाणी मेनहोल चेंबर बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची श्री.अब्दुल कदीर शेख रहीम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.०२% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१ :**

अतिरिक्त शहर अभियंता, प्रभाग 'अ' व 'ड' यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.३८ गांधीनगर, जरीपुरा, चुना भट्टी व बापुनगर इत्यादी ठिकाणी रस्त्यावर कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.११,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा दि.२८.२.२००८ च्या ठराव क्र.४०२ नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकुण ३ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 15% कमी दराने |
| 2. | राणा कन्स्ट्रक्शन | 5.32% कमी दराने |
| 3. | संधु कन्स्ट्रक्शन | 8.1% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची आहे. उक्त निविदा दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी मे.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३८ गांधीनगर, जरीपुरा, चुना भट्टी व बापुनगर इत्यादी ठिकाणी रस्त्यावर कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र.९८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९१,२९१/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र.३१६ दि.१७.१.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण चार निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. चंद्राम एन. आशन्ना | 27% जास्त दराने |
| 2. | श्री. राजेंद्रसिंग अजितसिंग | 29% जास्त दराने |
| 3. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 30% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी श्री.चंद्राम एन.आशन्ना यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% जास्त दराचे आहेत.

सदरील प्राप्त दर जास्त वाटत असल्याने श्री.चंद्राम एन.आशन्ना यांना दराचे वाटाघाटीस्तव बोलावले असता त्यांनी सदरील काम २७% जास्त ऐवजी १९% जास्त या दराने करण्याची संमती दर्शविली आहे व त्यास मा.आयुक्त यांची मान्यताही प्राप्त झाली आहे.

तरी सदरील काम श्री.चंद्राम एन.आशन्ना यांचेकडून वाटाघाटी अंती ठरलेल्या दराप्रमाणे म्हणजे अं.प. दरापेक्षा १९% जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.चंद्राम एन.आशन्ना यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, दिनांक 1/3/2009 ते 28/2/2010 या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात कर व रहदारी फी वसुलीकरिता खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी दिनांक 29/12/2008 च्या वर्तमानपत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. दिनांक 19/1/2009 पर्यंत ई-टेंडरींगद्वारे निविदांची विक्री झाली होती. ई-टेंडरींगद्वारे प्राप्त निविदा दिनांक 21/1/2009 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात आल्या. त्यांचा तपशील खालील प्रमाणे.

1. मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर.
2. श्री.सुनिल रामनारायण मंत्री, 173 सरस्वती भवन, नविपेठ, जळगांव.
3. मे. सहकार एजन्सीज् प्रा. लि., मालाड, मुंबई.

वरील प्राप्त निविदा धारकांपैकी श्री.सुनिल रामनारायण मंत्री, मुख्य पार्टनर यांनी निविदेतील अट क्र.6 नुसार एकूण देकार रक्कमेच्या 50% जकात कर वसुलीचा अनुभव नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले.

जकात कर वसुलीच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार 1) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर, 2) मे. सहकार एजन्सीज् प्रा. लि., मालाड(प), मुंबई यांनी निविदेतील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने सदरच्या दोन्ही एजन्सींचे ई-टेंडरींगद्वारे प्राप्त झालेले कमर्शियल-बीड (Commercial bid) उघडण्यात आले. ई-टेंडरींगद्वारे उघडण्यात आलेल्या जकात कर निविदेतील देकार रक्कमेचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**जकात कर निविदेतील प्राप्त झालेल्या देकार रक्कमेचा तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र. | निविदा एजन्सीचे नांव | एकूण देकार रक्कम |
|---|---|---|
| 1. | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर | 123,12,00,000/- |
| 2. | मे.सहकार एजन्सीज् प्रा.लि.,मालाड(प), मुंबई | 123,30,00,000/- |

वरील प्राप्त निविदां पैकी मे.सहकार एजन्सीज् प्रा.लि. मालाड(प), मुंबई यांनी सर्वात जास्त (Highest Bid) म्हणजेच रक्कम रूपये 123,30,00,000/- (अक्षरी रूपये एकशे तेवीस कोटी तीस लक्ष फक्त) चा सर्वाधिक देकार दिलेला आहे. तथापि प्राप्त देकार रक्कमेच्या अनुषंगाने संबंधिता सोबत वरील दिलेली देकार रक्कम वाढविणे करिता वाटाघाटी (Negotiation) करण्यास मे. सहकार एजन्सीज् प्रा. लि., मालाड(प), मुंबई यांना बोलाविण्यात आले.

जकात कर संकलनाकरिता सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम देण्यात आलेल्या संबंधित एजन्सी सोबत वाटाघाटी अंती रूपये 123.30 कोटी ऐवजी सन 2009-10 या वर्षासाठी एकूण देकार रक्कम रूपये **124,29,00,000/- (रूपये एकशे चोवीस कोटी एकोणतीस लक्ष फक्त)** पर्यंत वाढवून देण्याची लेखी संमती दिलेली असल्याने सदरची एकूण देकार रक्कम रूपये **124.29 कोटी** ही रक्कम देण्यास लेखी संमती दिलेली आहे. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनुसूची-'ड' मधील प्रकरण-8 चे नियम-35 मधील तरतुदींच्या अधीन राहून दिनांक **01/03/2009** ते **28/02/2010** या कालावधीसाठी सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम देणारे **मे. सहकार एजन्सीज् प्रा. लि., मालाड(प), मुंबई** यांना जकात कर संकलन करण्यासाठी **"जकात संकलन अभिकर्ता"** म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : सदरचा विषय मंजूर करण्यासाठी प्रशासनाकडुन खुलासा हवा आहे. सदरचा जो विषय होता तो कोर्टात गेला होता, टेंडर ज्यावेळी उघडलेला आहे त्यावेळी कोर्ट केस सुरू होते कोर्टाने त्या संदर्भात कोणते आदेश दिले. जर १० टक्के वाढवून मिळाली पाहिजे होती त्या संदर्भात खुलासा हवा आहे. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा. |
| जकात अधिक्षक | :२००९-२०१० या आर्थिक वर्षासाठी जकातीची निवीदा काढण्यात आली होती निवीदा काढल्यानंतर खोडसरी शुगर मिल,तलोदा यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती मा.उच्च न्यायालयाने १५ दिवसांची स्थगीती दिली होती. ०४ तारखेला याचिकेचा निकाल लागलेला आहे.मा.उच्च न्यायालयाने संबधीताची याचिका खारीज करून २५००० रूपये कॉस्ट लावलेली आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मागच्या वेळी १०टक्के वाढवून आले होते, त्या पध्दतीने का आला नाही. |
| जकात अधिक्षक | :दरवर्षी १० टक्के नैसर्गिक वाढ गृहीत धरल्या जाते. त्यानुसारच केले जाते. परंतु मंदिचा काळ असल्याकारणाने जे मागील वर्षीचे टार्गेट होते तेच ठेवण्यात आलेले आहे. |
| श्री.सतिष कटकटे | :इतर महानगरपालिका व मुंबई महानगरपालिकेकडुन जागतीक मंदीबाबत व तेथिल जकातीबाबत माहिती घेण्यात आली आहे काय? |
| जकात अधिक्षक | :माहिती काढण्यात आलेली आहे. मुंबई महानगरपालिकेत मागील वर्षी जकातीचे उद्दिष्ट ४४०० कोटीचे होते ते चालू वर्षी मंदिमुळे मुंबई महानगरपालिकेने १०० कोटींने कमी करून ४३०० कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. तद्ववतच अहमदनगर मनपात मागील वर्षी वसुलीचे प्रमाण ५८ कोटी ३६ लाखाचे होते मंदिमुळे ४८ कोटी ११ लाखावर उद्दिष्ट आणलेले आहे. नासिक मनपाचे मागील वर्षी पैक्षा १५ टक्के उत्पन्न मागच्या ३ महिण्यात घटलेले आहे. कमी भेटलेले आहे. |
| श्री.वसंत नरवडे | :जकात विषयी आम्ही आमच्या धोरणा नुसार १२३ ची जी निविदा काढली. त्या निविदेच्या बाबतीत आम्ही आमचे पत्र पाठविले होते की यात उद्दिष्ट १३५ कोटीचे असले पाहिजे महानगरपालिकेचे नुकसान होउ नये. |
| मा.सभापती | :स.सदस्यांकडून पत्र प्राप्त झाले का? |
| जकात अधिक्षक | :पत्र प्राप्त झाले नाही. |
| मा.सभापती | :सदरील पत्र प्रशासनाला मिळालेले आहे काय? |
| श्री.नरवडे पाटील | :मा.सभापती पत्र आपणांकडे पाठविलेले आहे. |
| मा.सभापती | :अद्याप पर्यंत पत्र मिळालेले नाही. मी विचारणा केली पत्र आले नाही. |
| श्री.वसंत नरवडे | :जकात खाजगीकरणामध्ये ज्या गाडया मुद्दाम जकात चुकून जातात असे निदर्शनास आणले जाते आणि त्यांच्या कडून १० पट रक्कम आणि टॅक्स वसुल केले जाते. शर्ती व अटी टाकतांना या विषयी चर्चा केली आहे काय? गुत्तेदारामार्फत अनेक प्रकारचे (या १० पट रकमेच्या वसुलीमध्ये) प्रकारचे भ्रष्टाचार घडतात. गुत्तेदार मनपाला पैसे न भरता खाजगी तडजोड केले जाते व महानगरपालिकेस माहीत नसते. गुत्तेदाराकडुन प्रत्येक गाडीचे ६ ते ७ टक्के मनपाला भेटले पाहिजे एखादे वाहन जकात अधिक्षकांनी पकडले तेवढे वृत्तपत्रात येते. पुन्हा महिणाभर येत नाही. प्रत्येक ठिकाणी आपणांस माणुस ठेवता येणार नाही. यातून किमान ६ ते ७ टक्के मनपास मिळावे व ३ टक्के ठेकेदाराला मिळावे. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा की, २००७-०८ मध्ये १० पट किती वसुली झाली. |
| जकात अधिक्षक | :२००७-२००८ या आर्थिक वर्षात १३७५४८० रूपये १० पट दंडापोटी वसुल झाले आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :टक्केवारीत किती टक्के होते. |
| जकात अधिक्षक | :टक्केवारीत ०.१ टक्के हाते. |

श्री.वसंत नरवडे :१० पट जो दंड वसुल केला जातो त्या १० पट दंडामध्ये व्यापाऱ्यांणवर अन्याय होत आहे. तडजोडीसाठी चार चार दिवस गाडया उभ्या असतात. तडजोड ही खाजगी मध्ये झाल्याशिवाय होत नाही. मनपाला कल्पना दिल्यानंतर माहिती मिळते. मा.आयुक्त श्री.बंड साहेब असतांना व्यापाऱ्यांनी पावत्यासह दिलेले आहे. १ रूपयाची वस्तु ४ रू. लावली ही कोणत्या अधिकारात बाजार भावाप्रमाणे लावलेतर ठिक पण दुप्पट लावतातत. ती रक्कम किती येते. मागच्या सभेत बोललो होतो. कास्मोटीक १२ हजाराचे आणले होते. त्याला २५ हजार करून जकात फाडली यातील तफावत ठेकेदार कोणत्या अधिकारात वसूल करतो. कारण जकात विभागाला प्रत्येक नाक्यावर माणुस नाही हा फक्त सेंट्रल नाक्यावर असतो. हे लोक सेंट्रल नाक्यावर घेवून जा म्हणतात व मध्येच धरतात व ही गाडी पळून जात होती म्हणून अडचणीत आणले जाते.

जकात अधिक्षक :जकात नियम १९८४ कलम १२ अन्वये आयात झालेल्या मालाची पुर्ण खुली तपासणी करून बाजार दरानुसार मुल्यांकन करण्याचे अधिकार आहे. सदरील अधिकार मनपाला आहे गुत्तेदारही पाहू शकतो. या संदर्भात एक उदाहरण असे की, इलेक्ट्रीकच बिल स्वतः ओपन डिलेव्हरी घेण्यात आली त्यांनी ३२८६४ रूपयांचे बिल आले होते. ओपन डिलेव्हरी घेवून मी स्वतः ॲसेसमेंट घेवून १लाख ८५ हजार बाजार दरानुसारच केले.

श्री.वसंत नरवडे :जिथे ऑक्ट्राय कमी लागत असेल प्रोडक्शनवर कमी खर्च येत असेल अशा ठिकाणच्या किंमतीला आधारभूत का नाही धरत.

जकात अधिक्षक :दोन्हींना मध्यस्ती काढुन ॲसेंसमेंट केली जाते. फिनोलेक्स चा ७२०चा बंडल घेतला तर १५४० रूपयाला येणार उल्हासनगरचा बंडल ४५० रूपयांना येणार. मुंबईचा १०२५ रूपये किमंत आहे. तिन्ही करून भागीले दोन केले जाते. कोणताही आला तर ७५० लागते.

श्री.वसंत नरवडे :जकात उद्दिष्ट १२३ वरून १२४ कोटी प्रशासनाने दिले. परंतु गुत्तेदाराकडे जी वसुली होते त्याचा लेखाजोखा आहे काय? त्यांनी हिशेब दिला का. ॲसेसमेंट करून डिफरन्ट दाखवला जातो काय? शर्ती अटी टाकतांना आम्हाला विचारले का, सल्ला घेतला काय?

जकात अधिक्षक :आपल्याकडे आल्यावर आपण पाहू, असे कुठे नाही. ॲसेसमेंट करून पावत्या फाडल्या जातात. ते १० पट होणार नाही कलम १२ मध्ये मुल्यांकन करण्याचे अधिकार आहे त्यानुसार मुल्यांकन केले जाते. आपणासही आहे व त्यालाही दिलले आहे.

श्री.वसंत नरवडे :किती वसूल करतो ते करायला पाहिजे. १२ हजाराला २५ हजार लावून वसूल केला तर १२ हजाराच्या Difference कळवला आहे काय? जादा वसूल केले ते कसे कळणार अटी शर्ती घाला. जो दंड आकारला जातो त्यातील ७ टक्के मनपामध्ये भरणा करावी. ३ टक्केच्या त्यांनी हिशेब ठेवायचा किती ठिकाणी घडले दर महिण्याचा अहवाल स्थायी समितीला द्यायला हवा.

श्री.संजय जोशी :व्हॅट बिला नुसार आकारले पाहिजे. व्हॅटच्या बिलाला चॅलेंज करण्याचा अधिकार मनपाला आहे काय? सर्जिकल आणि मेडीकल सोडून द्या त्याचा कायमचा वाद इतर वस्तु व्हॅट प्रमाणे जकात घेतो का?

जकात अधिक्षक :आपण डिलेवरी घेतली तर पुष्कळ ठिकाणी असे आढळून येते की, संगणक बिल व्यापारी/लोक आणतात व्हॅट नंबर त्यावर टाकलेला असतो, त्याला १० पट दंड सेल टॅक्स ऑफिस ला कळविले कळवून आकारला जातो. यातही फसवेगिरी करणारे आहेत. मी गेल्यापासून ३ महिण्यापासून पाहतो.

श्री.संजय जोशी : व्हॅटचे खरे बिल आणले जाते त्यांनाही याचा त्रास सर्वांना होतो. फसवेगीरी करणारे यांचेकडुन १० नाही तर २० पट वसूल करा जो इमानदारीने जसे किर्लोसकर, गरवारे,

मल्टीनॅशनल कंपणी हयातर डयुपलिकेट बिल करणार नाही. परंतु त्यावेळेसही आपण ग्राहय धरत नाही.

जकात अधिक्षक :गृहित धरतो व त्यांनीही मान्य केले आहे. गरवारे कंपणी एक्साईज डयुटीच दाखवत नव्हते फक्त स्टॉक रजिष्ट्ररचे इनव्हाईस दाखवत होते.

श्री.संजय जोशी :यानंतर व्हॅट नुसारच बिल घेतले जाईल. डयुटी अॅड करतात.

जकात अधिक्षक :मंदिच्या काळात इलेक्ट्रीक वस्तुंवर ७० टक्के डिस्कांउट आहे त्याला Consider केलेले नाही, व्हॅटजरी त्याला लागला असला तरी ३० टक्के डिस्काउंट घेवून पक्क्या बिलावर अॅसिसमेंट केलेले आहे. १९९६चा महाराष्ट्र शासनाचा जि.आर आहे की, डिस्काउंट बिलामध्ये किती जरी दिले असेल तरी मालाची मुळ किंमत आणि त्यानुषंगाने खर्च लावावा.

श्री.संजय जोशी :यापुढे व्हॅट नुसार घेता पण एखाद्या कंपणीचे हेड ऑफिस औरंगाबादला आहे व माल इतर शहरात जात असेल तर त्याच्याकडुन कुठल्या कायदयात जकात वसुलीचा अधिकार आहे. माल इथे थांबणार नाही तो इतरत्र विक्री होणार आहे.

जकात अधिक्षक :बिलींगवर शहराचा पत्ता आहे बिलींग येथिल असेल त्यानुसार जकात वसूल केली जाईल.

श्री.संजय जोशी :सदरील माल हा हया शहरासाठी न वापरता इतर शहरात वापरला जातो, समजा पुण्याहून माल आला आणि तो जालण्याला पाठवयचा परंतु संबधीत एजन्सीचे हेड ऑफिस औरंगाबाद आहे तरी त्यांच्या कडुन जकात वसुल केली जाते.

जकात अधिक्षक : नियम १६ नुसार ०.१०% जकात वसुल केली जाते. नियम १६ असा आहे की तो औरंगाबादला वसून धंदा करति असेल. बाहेर माल पाठवत असेल त्यांनी १००टक्के जकात भरायची त्यानंतर एक्पोर्ट नोट व एम्पोर्ट सर्टीफिकेट घ्यायचे आणि बाहेर माल गेल्यावर तो प्रमाणे करायचे १०० टक्के येणारा माल शहरात विकले जात नाही.

श्री.वसंत नरवडे :आम्ही आमचे पत्र दिले आपल्या पर्यंत पोहचले नाही असे जरी आपले मत असले तरी १३५ ला आता यापुढे जगात मंदी जरुर असेल पण भारतात तेवढा परिणाम नाही. भारतात मंदीची जास्त परिणाम नाही परंतु काहीजण त्या मंदीचा आपणावर दडपण आणुन कामगार कमी केले व मंदीचे वातावरण निर्माण करत आहे.

मा.सभापती :मुंबई आदर्श महानगरपालिका आहे त्यांनी नासिक,अहमदनगर महानगरपालिकेने जळगांव,मालेगांव मनपाने जकात उद्दिष्ट कमी केलेले आहे.

श्री.वसंत नरवडे :या शहरात पाहिजे तसा परिणाम नाही. मंदीचे वातावरण निर्माण करून महानगरपालिकेचे नुकसान करत आहे.

जकात अधिक्षक :शासनाने एक्साईज डयुटी ४% कमी केलेली आहे.

श्री.अ.रशिद मामु : किती एजन्सीने टेंडर भरणा केली आहे.

जकात अधिक्षक :तिन एजन्सीने टेंडर भरणा केली होती. १. मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. उल्हासनगर. २. श्री.सुनिल रामनारयण मंत्री, जळगांव ३. मे.सहकार एजन्सीज,मुंबई यांनी टेंडर भरणा केली होती. श्री.सुनिल मंत्री यांनी अट क्र. ६ नुसार ५०% जकात कर वसुलीचा अनुभव नसल्याने त्यांची Commercial Bid उघडलेली नाही. दोन लोकांची उघडण्यात आली होती.

श्री.अ.रशिद मामु :५० टक्केची अट लागू असतांना एजन्सी टेंडर भरणा करते. ते स्वत:येतात का की त्यानीा कोणी घेवून येतात.

मा.सभापती :ई-टेंडरींग पध्दत वापरण्यात आलेली आहे, ऑल इंडिया पेपरमध्ये जाहिरात देण्यात आली त्यानंतर २१ दिवसांचा अवधी देण्यात आला व तिन टेंडर आले. किती टेंडर यावे ही जबाबदारी प्रशासन किंवा स्थायी समितीची नाही.

श्री.अ.रशिद मामु :मे.सहकार ठेकेदार आहे की एजन्ट आहे.

मा.सभापती :एजन्ट आहे. जकात वसूल अभिकर्ता आहे.

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद मामु | :सहकार एजन्सीकडे मोठया प्रमाणात कर्मचारी वर्ग, संगणीकरण असतांना सुध्दा माल चोरून नेला जातो व १० पट दंड महापालिकेला दिला जात नाही. |
| मा.सभापती | :याबाबतीत तक्रारी आलेल्या आहेत की १० पट दंडाची रक्कम महापालिकेला दिल्या जात नाही. ०.१ टक्का रक्कम दंडापोटी मागील वर्षी वसुल झालेली आहे. |
| श्री.अ.रशिद मामु | :१० पटीची दंडाची रक्कमे पैकी ५% एजन्सीला आणि ५% मनपाला देण्यात यावे त्यामुळे चोरीला आळा बसेल. आपले  उत्पन्न वाढेल पेट्रोल,डिझेलचे भाव कमी झाले आहे. |
| श्री.वसंत नरवडे | :यापुर्वी दंडापोटी मनपाला ३० लाख रूपये वसुल झाले होते. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा. तीन वर्षापुर्वी किती. |
| अ.रशिद मामु | :जकात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे की चोरीला आळा घालणे. एजन्ट १० टक्के रक्कम वसुल करतो त्यातील अर्ध्या मनपाला आणि अर्ध्या वाटा गुत्तेदाराचा असला पाहिजे. जो पर्यंत पोलिसी ठरवत नाही तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. |
| श्री.रविकांत गवळी | :तिन महिण्यापुर्वी सांगीतले होते की आता आचारसहिंता लागण्यापुर्वी जकात अभिकर्ता नेमणे गरजेचे आहे म्हणून सांगीतले होते त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. प्रशासनाने ज्यावेळेस विषय मांडला त्यावेळी मागील वर्षी १२३ करोड ३० लाख रुपये ठेका होता जेणे करून १० टक्के नैसर्गिक वाढ अपेक्षीत होते. जकात अधिक्षक, मा.उपआयुक्त(म), आणि मनपाच्या अधिकाऱ्यांनी संचिका सादर केली त्यावेळी असा उल्लेख होता की महानगरपालिकेला विशेष असे नॉर्मस् नाहीत. परंतु १९९५ च्या जी.आर.मध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, १० टक्के नैसर्गिक वाढ गरजेची आहे. त्यानुषंगाने मनपाला काही नॉर्मस् लावून घेतले. जकात अभिकर्ता नेमणे संदर्भात,उदिष्टे नेमणे संदर्भात, स्थायी समितीची मान्यता घेणे गरजेचे आहे.त्यानुषंगाने सर्वसाधारण सभेत जकात अभिकर्ता नेमणे संदर्भात मंजूरी देण्यात आली होती. १३५ कोटी ठराव येणे अपेक्षीत होते. परंतु प्रशासनाकडुन असे कळाले की ठेका १२३ कोटींचा ठेवण्यात आलेला आहे कारण इतर मनपामधुन माहिती घेतली असता मुंबई महानगरपालिकेत दरवर्षी प्रमाणे २० ते २५ टक्के जी नैसर्गिक वाढ होती ती १० टक्के वाढ करण्यात आलेली आहे. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा केला आहे की, मुंबई महानगरपालिकेत कुठलीही नैसर्गिक वाढ करण्यात आलेली नाही. ४४०० कोटीचे टार्गेट होते ते आता ४३००कोटीचे करण्यात आलेले आहे. १२ ठिकाणच्या महापालिकेची नैसर्गिक वाढ झालेली नाही प्रशासनाने खुलासा केलेला आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :मी उशीरा आलो, हया वर्षी जकात खाजगीकरण करण्यास हरकत नाही. जकात अधिक्षक यांनी खुलासा केलेला आहे की जी १० पट दंड वसुल करतो जकात चुकविण्याऱ्यांकडुन त्याची रक्कम १३लाख ७५ हजार रूपये आहे. जी की १२३ करोड रूपयांच्या हिशोबाने ०.१ टक्का येतो.जकात चुकवून जे व्यापारी शहरात येतात त्यांना १० पट आकरली होते. १ पट जकात अभिकता्र व ९ पट महानगरपालिका घेते. |
| मा.सभापती | :महानगरपालिकेला ९ टक्काही मिळते, व १ टक्काही मिळते परंतु ते मिळत नाही, यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :जकात अभिकर्ता हा व्यापाऱ्यांना आरेरावी करतो व्यापाऱ्यांना त्रास होतो आता जो करारनामा करणार आहे करारनाम्यामध्ये काही बदल करणे गरजेचे  आहे. ज्या अटी आहे त्यात दुरूस्त करणे गरजेचे आहे. ज्या आवश्यक असेल त्या अटी वाढवण्यात याव्या. स्थायी समितीने मान्यता द्यावी. जे चुकीचे आहे ते कमी करावे. जेणे करून सर्वसामान्य नागरीकांना व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही. |

श्री.अ.रशिद मामु :संपुर्ण महानगरपालिकांमध्ये जकात उद्दिष्ट १० टक्कयांनी कमी झालेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये मागील वर्षी १२३ करोड रूपये होते ते हयावेळेस १२४ करोड रूपये झालेले आहे. त्यामुळे प्रशासनाचे आणि मा.आयुक्तांचे व स्थायी समितीस याबाबतीत अभिनंदन करतो. त्यामुळे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा. महाराष्ट्रात जकात उद्दिष्टाबाबत औरंगाबाद महानगरपालिका सर्वात पुढे आहे.

मा.सभापती :मा.प्र.आयुक्तांचे याबाबत अभिनंदन करण्यात यावे त्योनी १ कोटी वाढवून घेतले.

श्री.अ.रशिद मामु :स्थायी समिती सभापती ,सदस्य व मा.प्र.आयुक्तांचे पण अभिनंदन करतो, १० पट दंडाच्या रकमेचे ५० टक्के - ५० टक्के करण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी :५०टक्के-५०टक्के करण्यात यावे आणि कारारनाम्यानुसार ज्या अटी असतील त्या नियमानुसार दुरूस्त करण्यात याव्या.

श्री.संजय जोशी :मागील वर्षीसुध्दा करारनामा केला नाही. करारनामा हा रजिष्टर करणार आहेत काय? मागील वर्षी करारनामा १००० रूपयांच्या बॉन्डवर होता तो अधिकृत असू शकतो काय? रजिष्टर फि भरून नोंदणीकृत करारनामा करत नाही का.

जकात अधिक्षक :फ्रँकींग करून १००० रुपयाच्या बॉन्डवर कररनामा करणार आहोत, याही वर्षी तसे करू, रजिष्ट्री ऑफिसला याबाबत विचारणा केली असता रजिष्ट्री ऑफिसने लेखी कळविले आहे की, यामध्ये कुठल्याही सुचना नाहीत आपण आपल्या स्तरावर निर्णय घेवून रजिष्ट्रेशन करण्यात यावे.

श्री.संजय जोशी :मा.सभापती आपण मागील वेळेस श्री.गुप्ता साहेब असतांना बोलले होते की १००० रूपयांच्या बॉन्डवर अधिकृत होत नाही. रजिष्ट्रर झाल्याशिवाय मग या वर्षी काय करणार आहे.

मा.सभापती :नियमानुसार रजिष्टर करावे लागणार आहे.

जकात अधिक्षक :रजिष्ट्रर ऑफिसने लेखी कळविले आहे की करारनामा करतांना कुठलीही सुचना,नियम नाहीत आपण आपल्या स्थरावर निर्णय घेवून करारनामा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी :मागील बैठकीत चर्चा केली होती की ११ महिण्याच्या दुकाणे भाडे तत्वावर देतांना त्याच्यात एक टक्का भरून रजिष्टर करतो.

श्री.संजय जोशी :जो पर्यंत रजिष्ट्रर होत नाही तो पर्यंत एवढी मोठी निविदा काढत असतांना न्यायालयात महत्व राहत नाही. हे विधी सल्लागार कडून खुलासा होउ शकतो.

मा.सभापती :आपण नियमानुसार रजिष्टर करा असे सांगणार आहोत.

श्री.वसंत नरवडे :गेल्या तिन वर्षापुर्वी जकात अभिकर्ता येण्यापुर्वी ३० लाख दंडाची रक्कम जमा होत होती ती आता १३ लाखावर आली आहे १७ लाखाची तफावत आली आहे.

जकात अधिक्षक :माहिती घेत आहे. ३०-३२ लाखापर्यंत आहे, एक्सॅवर माहीती घेत आहोत

मा.सभापती :जकात अभिकर्त्यांनी दर महिण्यास १० पट दंडाची रक्कम किती वसुली झाली याबाबत स्थायी समितीला अहवाल देण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे :छोटे छोटे व्यापाऱ्यांचा जो ट्रान्सपोर्टद्वारे माल येतो तो व्हॅटनुसार असला तरी जिथे २ रूपयांच्या ऐवजी ४ रूपये लावले जातात छोटे व्यापारी ते २ रूपये घेणेकरीता जात नाही तर प्रशासनाने याबाबतीत काय केले आहे खुलासा करण्यात यावा. पावत्या दाखवतो, वॅट प्रमाणे आले, जास्त जकात लावले.

मा.सभापती :व्हॅल्युवेशनमध्ये वाद होतात तेव्हा आपण काय करतात.

जकात अधिक्षक :नियमानुसार व्हॅल्युवेशन केले जाते.

श्री.वसंत नरवडे :श्री.जाधव सभागृहातच आहे ते २ ते ३ वर्ष जकात अधिक्षक होते त्यांना सर्व माहीत आहे.

मा.सभापती :३० लाखा बाबत खुलासा करण्यात यावा.

जकात अधिक्षक :जकात अभिकर्त्यांकडे ४७० कर्मचारी आहेत आपल्यावेळेस फक्त १६५ कर्मचारी जकात वसुलीचे काम करत होते. लोक जास्त प्रमाणात चुकून आणायचा प्रयत्न करीत

होते, त्यांनी जास्त यंत्रणा लावली आहे. तिन पट कर्मचारी त्यामुळे जकात चोरीवर नियंत्रण आलेले आहे. तरी महानगरपालिकेचे दोन स्कॉट दररोज फिरतीवर असतात.

मा.सभापती :विषय क्रमांक २०३ वर सर्व सदस्यांनी चर्चा केली.स.सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले. विषय क्रमांक २०३ दुरूस्तीसह स.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे जकात संकलन अभिकर्त्याशी करारनामा करतांना तांत्रिक दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात येते तसेच १० पट दंडाची रक्कम आहे त्यातीत ५० टक्के मनपा प्रशासनाला मिळावे व ५० टक्के जकात अभिकर्त्याला मिळावे जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

श्री.वसंत नरवडे :अभिकर्ता हा आहे तोपर्यंतच ठेवण्यात यावे यास कायदा करू नका.

मा.सभापती :विषय क्रमांक २०३ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक 1/3/2009 ते 28/2/2010 या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात कर व रहदारी फी वसुलीकरिता खाजगी अभिकर्ता नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी जास्त देकार रक्कम असलेले निविदाधारक मे.सहकार एजन्सीज् प्रा.लि. मालाड (प), मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रक्कम रूपये **124,29,00,000/- (रूपये एकशे चोवीस कोटी एकोणतीस लक्ष फक्त)** चा सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम असलेले निविदाधारक **मे. सहकार एजन्सीज् प्रा. लि., मालाड (प), मुंबई** यांची **दिनांक 1 मार्च 2009 ते 28 फेब्रुवारी 2010** या कालावधीसाठी जकात वसुली करण्यासाठी **"जकात संकलन अभिकर्ता"** म्हणून नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. यांचे दि.2/2/2009 रोजीच्या पत्रानुसार, जकात संकलन अभिकर्ता यांचेशी करारनामा करतांना त्यातील, अटी-शर्ती क्र.09-Commission हा शब्द वगळणे, क्र.18- दैनंदिन वसुलीची माहिती देणेचे बंधन शिथील करणे, Contractror ऐवजी Agent व Contract ऐवजी Agreement असा शब्दप्रयोग करणे, क्र.31 आयातकाचे करंट अकौंट अनामत एजंटकडे असणे, क्र.15 दंड किंवा तडजोडीच्या प्रकरणत 50-50% समान रक्कम, क्र.16-मध्ये अतिवृष्टी, पूर, भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीचे प्रसंगी 10% व दोन दिवसांपेक्षा जास्त काळ वाहतुकदारांचा संप झाल्यास 40% सुट देणे या नैसर्गिक न्यायतत्वानुसार तांत्रिक दुरूस्त्यासह आवश्यक फेरबदल करण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>: ऐनवेळचे विषय :</u>

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : ऐनवेळचे काही प्रस्ताव आहेत ते मंजूर करण्यात येते.

श्री.संजय जोशी :शाळेचे बाक खरेदी करण्यासाठी बजेट ठरलेले आहे. बजेट संपण्याची वेळ आलेली आहे अजूनही विद्यार्थी पट्टयांवरती बसतात. ते लवकरात लवकर खरेदी करण्यात यावे.

मा.सभापती : याबाबतीत तात्काळ खरेदीचा प्रस्ताव प्रशासनाची मान्यता घेवून सादर करावा.

श्री.वसंत नरवडे : ५ लाख रूपये मंजूर करून पाणीपुरवठा लाईन बदलण्याचे आदेश करण्यात यावे.

मा.सभापती : मा.आयुक्तांकडे तात्काळ प्रस्ताव सादर करावा आणि त्याला तात्काळ ५ लाख रूपये खर्चाला मान्यता देण्यात येईल. ५ लाखाच्या खर्चाचा तात्काळ मंजूरी देण्यात यावी.

**<u>विषय क्र. २०४ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्राणी संग्रहालय सिध्दार्थ उद्यान येथील विद्युत खांबावरील उघडे तारा काढणे व पथदिव्यांची व्यवस्था करणे, या कामाचे सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.२,२५,२२६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००८-

०९ या आर्थिक वर्षात सिध्दार्थ उद्यान विकास या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. मा.शहर अभियंता यांनी कामे तातडीने करणे असे सुचविले आहे.

याकरीता स्थायी समितीमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या कलम (२) पोटकलम २ अंतर्गत मंजुरीकरीता प्रस्ताव सादर करणे बाबत सुचविले आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.२,२५,२२६/- चे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या कलम (२) पोटकलम २ अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालय सिध्दार्थ उद्यान येथील विद्युत खांबावरील उघडे तारा काढणे व पथदिव्यांची व्यवस्था करणेचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,२५,२२६/- चे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ च्या कलम (२) पोटकलम २ अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.२१, मिसारवाडी येथे अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रक्कम रूपये १९,९०,०००/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना शिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. अरबाज कन्स्ट्रक्शन | 22.01% कमी दराने |
| 2. | मे. आर. के. कन्स्ट्रक्शन | 20.99% कमी दराने |
| 3. | श्री.शेख सलीम मोहिउद्यीन | 12.87% कमी दराने |
| 4. | मे. इरम कन्स्ट्रक्शन कंपनी | 9.9% कमी दराने |
| 5. | काजी मुबारीजुद्यीन बशीरूद्यीन | 3.198% कमी दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०१% कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०१% कमी दराचे निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२१, मिसारवाडी येथे अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.०१% कमी दाची मे. अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग कार्यालय-फ अंतर्गत येणारा वॉर्ड क्र.९६ मधील मो.अबरार कॉलनी व अब्दुल हमीद कॉलनी परिसरात पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन नसल्यामुळे रहिवाश्यांना पिण्याचे पाण्याअभावी फार त्रस होत आहे. सदरील परिसर हा १९८० पासुन वसलेला असुन येथील सर्व रहिवाशी हे मालमजुरी तथा हमाली करणारे असुन या ठिकाणी गरीब अल्पसंख्यांक समाजाचे लोक जास्त प्रमाणात राहात असल्याने या भागात ६ इंची व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव व त्यासाठी येणारा अंदाजे खर्च रू.२५.०० लाख खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफीया फिरदौस अय्युब खान अनुमोदकः सिताराम सुरे, कचरू सोनवणे, केव्ही मोरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग कार्यालय-फ अंतर्गत येणारा वॉर्ड क्र.९६ मधील मो.अबरार कॉलनी व अब्दुल हमीद कॉलनी परिसरातील रहिवाश्यांना पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी ६ इंच व्यासाची

सी.आय. जलवाहिनी टाकण्यास व त्यासाठी लागणाऱ्या संभावीत खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ८५ काबरानगर गारखेडा अंतर्गत लक्ष्मीनगर पुर्व येथील खुल्या जागेत सांस्कृतिक हॉल बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१९,९७,६६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र.१७३ दि.२३/१०/२००७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामास्तव ई-निविदा मागविली असता सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा ११.८८% कमी दराची निविदा श्री.काजी म. फारूक म. ईस्माईल यांची प्राप्त झालेली आहे. सदरील प्राप्त निविदा दरास मा.स्थायी समितीने ठराव क्र.३५३ दि.५/२/२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

तथापी सदरील जागेत हॉल बांधणे साठी नागरीकांनी विरोध दर्शविला असल्याने विषयांकित कामाकरिता करण्यात आलेली तरतूद रक्कम रू.२०.०० लक्ष या कामा ऐवजी त्या प्रभागातील विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे या कामांतर्गत संरक्षित भिंत बांधणे अंतर्गत उद्यान विकसीत करणे, पाथवे तयार करणे इत्यादी कामे करणे बाबत व सदरील काम हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ड प्रकरण ५ नियम (२) (२) अंतर्गत कामाचे मुळ गुत्तेदार श्री.काजी म. फारूक म. ईस्माईल यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा ११.८८% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणे बाबत मागणी केलेली आहे.

त्यानुसार वॉर्ड क्र.८५ काबरानगर गारखेडा अंतर्गत उद्यान विकसीत करण्याचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ड प्रकरण ५ नियम (२) (२) अंतर्गत कामाचे मुळ गुत्तेदार श्री.काजी म. फारूक म. ईस्माईल यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा ११.८८% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ८५ काबरानगर गारखेडा अंतर्गत लक्ष्मीनगर पुर्व येथील खुल्या जागेत सांस्कृतिक हॉल बांधणे या कामाऐवजी वॉर्ड क्र.८५ मधील विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे या कामांतर्गत संरक्षित भिंत बांधणे अंतर्गत उद्यान विकसीत करणे, पाथवे तयार करणे इत्यादी कामे करणे हे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ड प्रकरण ५ नियम (२) (२) अंतर्गत कामाचे मुळ गुत्तेदार श्री.काजी म. फारूक म. ईस्माईल यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा ११.८८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.९८ मो.नक्षत्रवाडी येथे नविन सेप्टीक टँक बांधणे व ३०० मी.मी. एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,८९,५००/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षा खाली पृष्ठ क्र.डब्ल्यु-५६ अ.क्र.०८ वर रक्कम रू.१२.०० लाख इतकी उपलब्ध आहे. सदरील कामासाठी आवश्यक असणारी अतिरिक्त रक्कम रू.२,८९,५००/- सुधारीत अर्थसंकल्प सन २००९-१० मध्ये उपलब्ध करून देण्याच्या अटीवर मा.आयुक्त याची मान्यता झालेली आहे.

सदरील कामामध्ये प्रभाग क्र.९८ मो.नक्षत्रवाडी येथे नविन सेप्टीक टँक बांधणे व ३०० मी.मी. एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९८ मो.नक्षत्रवाडी येथे नविन सेप्टीक टँक बांधणे व ३०० मी.मी. एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,८९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. काम लवकर सुरू होण्याचे दृष्टीने अल्पमुदतीची निविदेची कार्यवाही करावी. वैधनिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद